**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, रेल्वे स्टेशन जवळ,पुणे -४४ दुरध्वनी क्र. ०२०-२७१६६०००**

**"वेब साईट अद्यावत ठेवणेबाबत"**

**निविदा सूचना क्र :- १ -२०१६-१७**

**(विद्युत विभाग)**

पिंपरी चिंचवड विकास प्राधिकरण कार्यालयाची माहिती जनतेसाठी सहजपणे उपलब्ध व्हावी यासाठी अद्यावत वेबसाईट तयार करण्यात आलेली आहे. सदर वेबसाईटवर वेळोवेळी माहिती अद्यावत करणे, वेबसाईटमध्ये नवीन माहितीकरीता नवीन वेब पेज तयार करणे, टेंडर नोटीस व इतर सर्व नोटीस प्रसिद्ध करणे व प्राधिकरण कार्यालयाची इतर माहिती वेबसाईटवर प्रसिद्ध करुन वेबसाईट अद्यावत ठेवणे इत्यादी कामासाठी या क्षेत्रातील अनुभवी, तज्ञ व्यक्ती/ संस्था यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सदर काम हे पुढील ३ वर्षांकरीता करणे प्रस्तावित आहे. को-या निविदेचा फॉर्म कार्यकारी अभियंता (विद्युत) विकास प्राधिकरण,आकुर्डी,पुणे. यांच्या कार्यालयात दिनांक : ३० / ०५ /२०१६ पासून कार्यलयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी १.०० वाजेपर्यंत रक्कम रु. ५००/- चलनाद्वारे बँकेत भरणा केल्यानंतर देण्यात येईल. निविदा फॉर्म भरुन व नमूद केलेली कागदपत्रे जोडून आपला प्रस्ताव दिनांक- १३/०६/२०१६ पर्यंत प्राधिकरण कार्यालयात समक्ष आणून द्यावा. अटीयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा उघडण्याच्या दिनांकापासून १२० दिवसांपर्यंत निविदेतील दर ग्राहय धरण्यात येतील. निविदा स्विकृती पत्र पाठविल्या नंतर ८ दिवसाचे आत सुरक्षा अनामत रक्कम रु. २०,०००/- (अक्षरी रु. वीस हजार फक्त) भरून करारनामा करावा लागेल. निविदा सादर करणा-या ठेकेदारांना निविदेतील सर्व अटी मान्य असल्याचे समजण्यात येईल व निविदेबाबत कोणतीही तक्रार किंवा सुचना नोंदवून घेण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. प्रस्ताव स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, विकास प्राधिकरण यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**निविदा फॉर्म विक्री दिनांक :** ३०/०५/२०१६

**निविदा स्विकारण्याचा दिनांक :** १३/०६/२०१६

**निविदा उघडण्याचा दिनांक :** १४/०६/२०१६

**निविदा फॉर्म फी रक्कम - ५००/- (प्रत्येकी)**